# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः01.10.2025** **वारःबुधवार**

---

•पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी सोहळ्यामध्ये सहभागी होणार.
•रिझर्व्ह बँक आज द्वैमासिक पतधोरण जाहीर करणार.
•दुष्काळी टंचाईच्या सर्व सवलती अतिवृष्टीग्रस्त प्रदेशाला लागू करण्याचा महाराष्ट्र मंत्रिमंडळाचा निर्णय
•एकात्मिक निवृत्तिवेतन योजना म्हणजे यूपीएसच्या निवडीसाठी दोन महिन्यांची मुदतवाढ.
•आयसीसी महिला विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेत श्रीलंकेचा ५९ धावांनी पराभव करून भारताची विजयी सलामी.

**मोदी संघशताब्दी**
पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी नवी दिल्लीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी सोहळ्यामध्ये सहभागी होणार आहेत. या सोहळ्यात संघाचा वारसा, सांस्कृतिक योगदान आणि देशाच्या एकात्मतेत संघाची भूमिका या गोष्टी अधोरेखित केल्या जाणार आहेत. पंतप्रधान या प्रसंगी संघाचं देशाप्रती योगदान अधोरेखित करणाऱ्या विशेष टपाल तिकिटाचं आणि नाण्याचं प्रकाशनही करणार आहेत.

**रिझर्व्ह बँक पतधोरण**
रिझर्व्ह बँक आज आपलं द्वैमासिक पतधोरण जाहीर करणार आहे. रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण आढावा समितीची तीन दिवसांची बैठक सोमवारी मुंबईत सुरू झाली. आता आज बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा दहा वाजता पतधोरण जाहीर करतील. यापूर्वी ऑगस्ट महिन्यात झालेल्या पतधोरण आढाव्यात रेपो दरांमध्ये कोणताही बदल करण्यात आला नव्हता.

दरम्यान, आजपासून सुरू होणाऱ्या तिमाहीसाठी अल्पबचत योजनांवरील व्याजदरांमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. आर्थिक व्यवहार विभागानं काल याबाबत घोषणा केली. त्यामुळे सार्वजनिक भविष्यनिर्वाह निधीवरील व्याजदर सात पूर्णांक एक दशांश टक्के, तर सुकन्या समृद्धी योजनेवरील व्याजदर आठ पूर्णांक दोन दशांश टक्के इतका राहणार आहे.

**<u>मंत्रीमंडळनिर्णय</u>**

ओला दुष्काळ जाहीर करण्याची कोणतीच तरतूद नियमात नसल्याने महाराष्ट्रात आजवर कधीच ओला दुष्काळ जाहीर झाला नाही. मात्र, दुष्काळी टंचाईच्या काळात ज्या सवलती आणि उपाययोजना केल्या जातात त्या सर्व आता या अतिवृष्टीच्या काळात लागू करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आल्याची माहिती  मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. मंत्रिमंडळाच्या काल झालेल्या बैठकीत राज्यातल्या अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीचा आढावा घेण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. ही सगळी मदत दिवाळीपूर्वी देण्याचा आपला प्रयत्न असल्याचं ते म्हणाले. आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांकडील कर्जाची वसूली थांबवावी असे निर्देश बँकांना दिल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**<u>यूपीएस मुदतवाढ</u>**

एकात्मिक निवृत्तिवेतन योजना म्हणजे यूपीएसमध्ये निवडीसाठीच्या मुदतीत सरकारनं दोन महिने वाढ केली आहे. ही मुदत काल संपणार होती. मात्र, आता पात्र कर्मचारी, निवृत्त कर्मचारी आणि निवृत्त कर्मचाऱ्यांचे कायदेशीर जोडीदार यांना तीस नोव्हेंबरपर्यंत आपली निवड निश्चित करता येणार आहे.
या योजनेत अनेक सकारात्मक बदल करण्यात आल्याचं अर्थ मंत्रालयानं काल प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. या बदलांमुळे अनेक कर्मचाऱ्यांनी यूपीएसच्या निवडीसाठी वेळ मागितल्यामुळे मुदतीत वाढ करण्यात आल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<u>राष्ट्रपती ट्रंपेट</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल राष्ट्रपतींच्या शरीररक्षक पथकाला म्हणजे पीबीजीला अमृतमहोत्सवी चांदीची ट्रंपेट आणि ट्रंपेट बॅनर प्रदान केला. पीबीजीच्या सेवेला पंचाहत्तर पूर्ण झाल्यानिमित्त काल आयोजित केलेल्या अमृतमहोत्सवी सोहळ्यात राष्ट्रपतींनी ट्रंपेट प्रदान केला.

**<u>बिहार मतदार</u>**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांनी बिहारचे मतदार आणि बिहारच्या निवडणूक आयुक्तांसह इतर निवडणूक अधिकारी आणि नोंदणी अधिकाऱ्यांचे आभार मानले आहेत. बिहारमध्ये २२ वर्षांनंतर झालेला मतदार पुनरीक्षण कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल त्यांनी राजकीय पक्षांचे नेते आणि माध्यमांचेही आभार मानले आहेत. बिहारमधल्या विधानसभा निवडणुकीसाठी ओयगानं अंतिम मतदार यादी काल प्रसिद्ध केली. या यादीत सात कोटी ४२ लाख मतदारांचा समावेश आहे.

Intro :सेवा आणि सुशासन, हा मंत्र समोर ठेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार देशात परिवर्तन आणि प्रगती घडवून आणण्यासाठी अथक प्रयत्न करत आहे. सेवा पर्व या विशेष मालिकेत आज ऐकुया भारताच्या जी २० मधील यशाबद्दल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारताला एक प्रबळ नेतृत्व असलेला देश म्हणून जगाच्या नकाशावर स्थान मिळालं आहे. भारतानं वर्ष २०२३ च्या, जी २० परिषदेचं अध्यक्षपद भूषवल्यामुळे जागतिक पटलावर दक्षिणेकडील देशांची भूमिका मांडता आली आणि त्याचे ठोस परिणामही दिसून आले. आफ्रिकन युनियनला जी २० गटात सहभागी करून घेणे आणि जैवइंधनासाठी जागतिक स्तरावर भागीदारी, हे यातील महत्त्वाचे मुद्दे आहेत. भारतात झालेल्या जी २० परिषदेचं "वसुधैव कुटुंबकम" हे घोषवाक्य देशाची समृद्ध संस्कृती, नीतीमत्ता आणि जागतिक सहकार्याची इच्छा अधोरेखित करतं.
याबाबत बोलताना पंतप्रधान मोदी म्हणतात.......

**<u>मोदी Byte</u>**
भारतातील जी 20च्या बैठकांच्या माध्यमातून ग्लोबल साउथचा आवाज तर बळकट झालाच, त्याचबरोबर देशभरात ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाच्या ठिकाणी या बैठका आयोजित करून भारतानं आपला सांस्कृतिक वारसाही जगासमोर आणला.

**<u>दुर्गानवमी</u>**
देशभरात आज दुर्गानवमी साजरी करण्यात येत आहे. महानवमी या नावानंही ती साजरी केली जाते. नवरात्रीच्या या नवव्या दिवशी भाविक दुर्गादेवीचं रूप असलेल्या देवी सिद्धीदात्रीची पूजा करतात. आजच्या दिवशी कन्यापूजनही केलं जातं.

उद्या साजऱ्या होणाऱ्या विजयादशमीच्या म्हणजे दसऱ्याच्या सणाचा उत्साह सर्वत्र बघायला मिळत आहे. साडेतीन मुहूर्तांपैकी एक असा हा सण संपूर्ण देशभरात साजरा करण्यात येतो.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती २ ऑक्टोबर रोजी 'जागतिक अहिंसा दिन' म्हणून साजरी केली जाते. त्यानिमित्त उद्या अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा शताब्दी समारंभही उद्या नागपूरच्या मुख्यालयात होणार आहे. 69व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनही उद्या नागपूरमध्ये साजरा होत आहे. या निमित्तानं भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी लाखो अनुयायी नागपूरमध्ये येत आहेत.

**<u>तामिळनाडू</u>**
तमिळनाडूमध्ये काल संध्याकाळी एन्नोर भेल औष्णिक ऊर्जा प्रकल्पात बांधकाम सुरू असलेली एक कमान कोसळून नऊ मजुरांचा मृत्यू झाला, तर अनेक जण जखमी झाले. मृतांमधील बहुतेक जण आसाममधील

आहेत. जखमींना स्टॅनले सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी मृतांच्या कुटुंबीयांना दहा लाख रुपये आर्थिक मदतीची घोषणा केली आहे.

**भूकंप**

फिलिपिन्सच्या मध्य भागात, काल झालेल्या 6 पूर्णांक 9 रिखटर तीव्रतेच्या भूकंपात किमान २२ लोकांचा मृत्यू झाला. या भूकंपात मोठ्या प्रमाणावर जीवित आणि इतर नुकसान झालं असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. तिथल्या स्थानिक वेळेनुसार रात्री 10 वाजता हा भूकंप झाला असल्याचं यूएस जिओलॉजिकल सर्व्हेनं म्हटलं आहे. सन रेमिजिओ शहरात बास्केटबॉल सामन्यादरम्यान क्रीडा संकुल कोसळून फिलिपिन्स तटरक्षक दलाच्या तीन सदस्यांचा आणि एका अग्निशमन कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला.

**कॉंगो मृत्युदंड**

कॉंगोचे माजी अध्यक्ष जोसेफ काबिला यांना युद्धातील सहभाग आणि देशद्रोहाच्या गुन्ह्याबद्दल मृत्युदंडाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. कॉंगोच्या पूर्व भागात विनाश घडवणाऱ्या एम २३ या बंडखोरांच्या संघटनेला पाठिंबा दिल्याचा त्यांच्यावर आरोप ठेवण्यात आला होता. काबिला यांनी आरोप फेटाळून लावले असून, न्यायालयांचा सोयीस्कर वापर करून घेतला जात असल्याचा दावा केला आहे. ते सध्या अज्ञातस्थळी गेले आहेत. ते २००१ ते २०१९ या काळात अध्यक्ष होते. २०१९मध्ये त्यांनी फेलिक्स शिसेकेदी यांच्याकडे सूत्रे सोपवली होती. मात्र त्यांच्यात वाद झाल्यानंतर काबिला २०२३पासून अज्ञात स्थळी गेले आहेत.

**महिला क्रिकेट**

आयसीसी महिला विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेत काल भारतानं श्रीलंकेचा ५९ धावांनी पराभव करून विजयी सलामी दिली. भारतानं ४७ षटकांमध्ये २६९ धावा केल्या. अमनज्योत कौरनं ५७ धावा करून भारताची बाजू मजबूत केली. पावसामुळे सामन्यात व्यत्यय आल्यामुळं भारताची धावसंख्या २७० अशी निश्चित करून श्रीलंकेपुढे विजयासाठी २७१ धावांचं आव्हान ठेवण्यात आलं होतं. मात्र, श्रीलंकेचा संघ ४५ षटकं आणि चार चेंडूंमध्ये सर्वबाद २११ धावाच करू शकला. आता भारत आणि पाकिस्तान संघांदरम्यानचा बहुप्रतीक्षित सामना कोलंबोमध्ये रविवारी होणार आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्राचं राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**